**परिपत्रिका**

प्रिय फ्रेन्जायझी (आय.सी.डबल्यू),

आजच्या दिवसाकरीता शुभेच्छा!!!!!

आर.आर.सी.टी.सी द्वारा आमच्या असे निदर्शनास आणून दिले गेले आहे की फ्रॅन्चायझी आय.आर.सी.टी.सीच्या काही ग्राहकांबरोबर बेकायदेशीर आणि अनैतिकपणे कामकाज करत आहेत. फ्रेन्चायझी द्वारा काही सामान्यपणे केल्या जाणाऱ्या बेकायदेशीर आणि अनैतिक घटना ज्या आय.आर.सी.टी.सी ने आमच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत त्या खालील प्रमाणे:

१) आय.आर.टी.सी ने लागू केलेल्या शुल्का पेक्षा ग्राहकांकडून जास्ती शूल्क घेणे,

२) खऱ्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क दाखविण्याकरीता तिकीटाच्या किंमती बदलणे/ त्यात फरक करणे,

३) आय.आर.सी.टी.सी च्या वेब पोर्टलवर www.irctc.co.in (बी२सी) वैयक्तिक प्रवासी दाखवून घेऊन खोटा युझर प्रोफाईल तयार करणे आणि त्यांच्या ग्राहकांकरीता तात्काल रेल्वे तिकिटं काढणे आणि आय.आर.सी.टी.सी च्या ग्राहकांसाठी असलेल्या वेब पोर्टलचा व्यावसायिक वापर करणे.

४) एजंटसाठी निर्बंध असलेल्या ८ ते ९ वेळेत वैयक्तिक युजर आय डी ने तत्काळ रेल्वे ई टिकिट बुक करणे.

५) आय.आर.सी.टी.सी च्या वेब पोर्टल आणि वेब सर्व्हिसेस मधून बुकिंग आपोआप करण्याकरीता बेकायदेशीर सॉफ्टवेअर चा उपयोग करणे.

६) तिकिट रद्द केल्यानंतर पैसे परत न देणे/उशीरा देणे.

७) ई टिकिट मागणी/रद्द करण्याच्या पावत्या न भरणे.

८) खोटे टी.डी.आर भरून देणे.

९) आय.आर.सी.टी.सी ने वेळो वेळी सांगितलेल्या, काय करावे आणि काय करू नये व इतर अटी आणि नियमांचे पालन न करणे.

आम्ही तुम्हाला सांगू इच्छितो की वरती नमूद केलेल्या चुकीच्या गोष्टींनी कायद्याचे उल्लघंन होते आणि त्यामुळे जर तुम्ही दोषी आढळून आलात तर तुमच्यावर दंडनीय कार्यवाही करण्यात येऊ शकते:

२) जर शुल्कावरती जास्त पैसे आकारले गेले तर त्या रकमेच्या दुप्पट रक्कम घेतली जाईल आणि

३) रू. २०००० (रुपये वीस हजार फक्त) प्रत्येक बाबी करीता दंड म्हणून आकारले जातील आणि

४) तुमच्या हद्दीतील पोलिस स्टेशनमध्ये किंवा तत्सम न्यायालयात तुमच्या विरोधात एफ.आय.आर किंवा गुन्हेगारी प्रक्रिया करण्यात येईल ज्यामुळे तुम्हाला जेल किंवा दंड किंवा दोन्ही लागू होऊ शकतात.

आय.सी.डबल्यू ना असे कळविण्यात येते की वर नमूद केलेल्या चुकीच्या गोष्टींमुळे त्यांना दंड होऊ शकतो.

त्यामुळे सगळ्यांना असा सल्ला देण्यात येतो की अशा कामांपासून सगळ्यांनी दूर राहावे आणि आम्हाला तुमच्यावर दंड आकारण्याच्या किंवा तुमचे आय.डी काढून घेण्याच्या पेच प्रसंगात अडकवू नये.

धन्यवाद

द्वारा इंटरॅक्टिव्ह फायनॅन्शियल अॅन्ड ट्रेडिंग सर्व्हिसेस प्रा.लि.

२६/०४/२०११